भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र.२२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०३/२०१७

१) अज्ञातचोराने गोडाऊनमधील गव्हाचे व धानाचे पोते चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १६/०३/२०१७ चे १८.३० वा. ते २७/०३/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने डुप्लीकेट चाबी लावुन शाळेला लागुन असलेल्या फिर्यादीचे गोडाऊनचे शटर्स ला लावुन असलेला कुलुप उघडुन आत प्रवेश करुन गव्हाचे पोते, १६ धानाचे पोते असा एकुण ३,८०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी आनंद मोतीलाल धांडे वय ४५ वर्ष बेलघाट वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

२) संगनमत करुन जादु केल्याचे कारणावरुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०८/०३/२०१७ चे ०८.०० वा. ते २६/०३/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील तीनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तु माझ्या पत्नीवर जादु केली म्हणुन रुमत आहे तुझ्या मुळे अंगात भुत येते असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन करुन तु रस्त्यात भेटलास तर जिवानीशी ठार करीन अशी धमकी दिल्याने व फिर्यादीची बदनामी केल्याने फिर्यादी वामन तिरकु पचारे वय ४४ वर्ष, रा. गोसे खुर्द यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे २९४,५०६,३४ भादवि. सहकलम २(१)(ख)(६),३(२) म.न.व ईतर अनिष्ठ अघोरी प्रथा व जादु टोणा प्र. कायदा २०१३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

३) मोटार सायकल निष्काळजीपणे चालवुन स्लीप होवुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १५/०२/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील आरोपी मृतक राजेन्द्र चंद्रभान मेंढे वय १८ वर्ष, रा. कोदुर्ली यांनी आपले ताब्यातील हिरो होन्डा मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम २५७९ चे मागील सीटवर सुरज रतीराम घुटके वय १७ वर्ष, रा. कोदुर्ली याला बसवुन मोटार सायकलने कोदुर्ली वरुन तिरखुरी गावाला येत असतांना यातील मृतक आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने चालवुन मोटार सायकल ही स्लीप होवुन मृतक मोटार सायकल सह रोडवर पडुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने मर्ग क्र. ०५/१७ कलम १७४ जाफौ. चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. राऊत पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,३०४ (अ) भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वाडीवे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहे.

४) डोक्यावर दगडाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

अ) दिनांक २८/०३/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचा जावई असुन आरोपीने फिर्यादीचे बहीनीला तु घरी चाल असे म्हणुन शिवीगाळ करीत असता फिर्यादीचे आईने तु कशाला शिवीगाळ करतोस अशी बोलली असता आरोपीने फिर्यादीचे डोक्यावर उजवे बाजुला दगडाने मारुन तसेच फिर्यादीचे आईला काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादी कोमल राधेश्याम कटरे वय २१ वर्ष, रा. येरली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे ३२४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. साखुरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

ब) दिनांक २८/०३/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे पतीने तिच्या आईचे घरी येवुन आई व भावाला मारहान करीत असतांना भांडणात आरोपीने फिर्यादीचे पतीचे डोक्यावर मध्यभागी दगड मारुन जखमी केल्याने फिर्यादी रेखा रवीन्द्र पटले वय २८ वर्ष, रा. येरली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे ३२४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. साखुरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**६) सार्वजनीक ठिकाणी वाहन उभे ठेवुन रहदारीस अळथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०३/२०१७ चे १७.३० ते १८.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मिनी डोअर गाडी क्र. एमएच ३६/३५७० चा चालक याने आपल्या ताब्यातील वाहन राज्य मार्ग क्र. २७१ वर अडयाळ बस स्टॉप समोर धोकादायक रित्या उभी करुन रहदारीस अडथळा निर्माण केल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**७) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक २८/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर, पवनी, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३३ लिटर हातभट्टी दारु किंमती १९८०/—रु. व ३४५ लिटर ४२० मिली लिटर देशी दारू+ स्कॉपीओ किंमती २,९५,९५०/—रु. तसेच जुगारातुन ४१२/—रु. चा माल असा एकुण २,९८,३४२/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांस भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.